# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### तळणी बृहत लघू पाटबंधारे (ता.बिलोली, जि.नांदेड) या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना शेत जमिनीचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत

**(१) १०४३४ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळणी बृहत लघू पाटबंधारे प्रकल्प (ता.बिलोली, जि.नांदेड) या प्रकल्पांतर्गत बाधीत जिगळा, तळणी, लोहगाव, किनाळा व रामतीर्थ या गावातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्यासंबंधी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग नांदेड यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने सदर निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) या प्रकल्पाच्या भुसंपादनासाठीच्या एकूण रु.४०४.२३ लक्ष मागणीपैकी, आतापर्यंत रु.३२६.७२ रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम निधी उपलब्धतेनुसार वितरीत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर शहरात मंजूर असलेले आदिवासी मुला व मुलींचे वसतीगृहाची इमारत बांधण्याबाबत

**(२) १३५११ (१०-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरात मंजूर असलेले आदिवासी मुला व मुलींची वसतीगृहाची इमारत बांधण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी, चंद्रपूर यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१४ आणि १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर शहरातील मौजा - चांदा रै येथील सर्व्हे नं ४६९/१, ४६९/२, व ५.०१ आराजी ०.३२ हे.आर जागा मा.सहा.अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांचे पत्र क्र. कावि/ कार्या-४/ टे-५ /नझूल/२०१३/५७८/ दिनांक २६/०६/२०१३ अन्वये आदिवासी विभाग चंद्रपूर कार्यालयाला अभिहस्तांकीत करण्यात आले असल्याचे कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवर आदिवासी मुला व मुलींचे वसतीगृहाची इमारत बांधकाम करण्यासंदर्भात कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चंद्रपूर शहरात सन २०१० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वसतीगृहाला मंजूरी प्रदान करण्यात आली असून रु. ६.८८ कोटी निधीची तरतूद करण्यात आली असतांना व जागा उपलब्ध होवून सुध्दा अद्यापही इमारत बांधकाम करण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही सुरु न करण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०८-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) चंद्रपूर शहरातील मुलींच्या वसतिगृहाच्या अंदाजपत्रकास दि.२८ मार्च, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याने सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात निधी ची तरतूद करण्यात आली होती असे म्हणणे संयुक्तिक नाही.

सदर वसतिगृह बांधकामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये, जागा उपलब्ध झाली. जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांच्यामार्फत प्राप्त झालेल्या जमिनीवर स्थानिक नागरिकांना अतिक्रमण करून घरे बांधलेली असल्याने तेथील जागेवर वसतिगृह बांधकामास नागरिकांना विरोध दर्शविला. त्यामुळे प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर यांचेमार्फत पर्यायी जागेची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पर्यायी जागा प्रकल्प अधिकारी कार्यालयास वसतिगृहासाठी उपलब्ध करून देण्यात आली. सदर जागेवर मुलींच्या २ वसतिगृहाचे बांधकाम सुरु आहे.

सदर जागेवर मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामाव्यतिरिक्त शिल्लक असलेल्या जागेवर मुलांच्या २ वसतिगृहाचे बांधकाम प्रस्तावित आहे.

---

## पंचायत समिती (ता.बिलोली, जि.नांदेड) या कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास निधी मिळण्याबाबत

**(३) २२६७० (१७-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (ता.बिलोली, जि.नांदेड) या कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे अत्यल्प काम निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे सदर इमारतीमध्ये कामकाज चालू करण्यास विलंब होत असल्याप्रकरणी चौकशी करण्यात येवून दोषीवर कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारवाईचे स्वरूप काय आहे,
(३) तसेच इमारतीचे काम पूर्ण होवून लोकार्पण करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, निधीची उपलब्धता जाणीवपूर्वक न केल्याप्रकरणाची चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) बिलोली पंचायत समिती जिल्हा नांदेड प्रशासकीय इमारतीच्या कामास शासनाकडून पूर्ण निधी देण्यात आला होता. तथापि सदर निधीपैकी काही निधी तांत्रिक कारणांमुळे विहीत कालावधीत खर्च होऊ शकला नाही.

जिल्हा परिषद नांदेड या प्रकरणी निधीची मागणी शासनाकडे केली होती तथापि या पंचायत समितीस वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे झालेला खर्च जिल्हा परिषद नांदेड यांनी करावा असे शासनाचे दि. २४.०९.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घाटंजी तालुक्यातील घाटंजी येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या फर्निचरच्या कामाच्या निविदाना मंजूरी मिळण्याबाबत**

**(४) २५२६३ (१७-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटंजी तालुक्यातील घाटंजी येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून तेथील फर्निचरचे कामाच्या निविदा प्रकरणास मंजूरी मिळणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०६-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) सन्माननीय सदस्यांच्या निवेदनातील मागणीनुसार घाटंजी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकामाच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेची उपकामे प्राप्त निविदेनुसार

अनोंदणीकृत फर्निचर / मॉड्युलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार / अंतर्गत सजावटदार यांच्याकडून करुन घेण्यास दिनांक २४.०३.२०१५ रोजी मंजूरी प्रदान करण्यात आली असून पात्र कंत्राटदारास दिनांक ३०.०३.२०१५ रोजी कामाचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील अंजनगाव सुर्जी येथे पंचायत समितीची प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(५) २५६०७ (१४-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील अंजनगाव सुर्जी येथे पंचायत समितीची प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत निधी उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१४ व दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी मा.ग्रामविकास मंत्री यांचे कडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०६-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) अंजनगाव सुर्जी नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावातील त्रुटींच्या पुर्ततेसह प्रस्ताव सादर करण्याबाबत अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. जिल्हा पषिद अमरावती यांच्या स्तरावर सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेपेरा ते भुरकी (ता.वाणी, जि.यवतमाळ) या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) ३६७५२ (१६-०१-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेपेरा ते भुरकी (ता.वाणी, जि.यवतमाळ) या रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित असून रस्त्यावर केवळ माती टाकण्यात आली असल्याने पक्का रस्ता अद्याप झाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ता सुस्थितीत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने तातडीने हा रस्ता तयार होण्याबाबत नागरीकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ताचे काम प्रलंबित असल्याचे कारणे काय आहेत,
(४) असल्यास, रस्ता पूर्ण करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल (२७-०६-२०१७)** :(१) होय.
(२) नाही, तक्रार / मागणी प्राप्त नाही.
(३) सदर काम मग्रारोहयो अंतर्गत घेण्यात आले असून मजूरांची काम मागणी नसल्यामुळे काम प्रलंबित आहे.
(४) मजूरांची काम मागणी प्राप्त झाल्यास काम पूर्ण करता येईल.

---

**मत्स्य व्यवसाय करणाऱ्या महिलांना दिलेले अत्याधुनिक सुविधायुक्त वाहन वापराविना पडून असल्याबाबत**

**(७) ४४५७६ (२०-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मत्स्य व्यवसाय करणाऱ्या महिलांना बचत गटाच्या माध्यमातून चालना देण्यासाठी शासनाने दिलेल्या अत्याधुनिक सुविधायुक्त वाहन वापरविना गेली दोन वर्षे सिंधुदुर्ग जिल्हयात पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाच्या गाडया खरेदी करिता लाखो रुपयांचा निधी वाया गेला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गाडया वापराविना पडून असल्यामुळे लाभार्थी उपक्रमातून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास चौकशीअंती काय आढळून आले वा त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७)** :(१) नाही.
(२) नाही.
(३), (४), (५) व (६) चार वाहनांपैकी एक वाहन काही साहित्य आढळून न आल्याने बचत गटाने घेण्यास नकार दिल्याने सदर वाहन सुस्थितीत असल्याने अन्य बचत गटास वाहन पुरविण्यात आले आहे.

---

## पारंपरिक मच्छिमार समाजाच्या आर्थिक सुरक्षिततेबाबत

**(८) ४४९२२ (३०-०४-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्षेत्रापुरता मर्यादित असलेला पेसा कायद्याअंतर्गत सरकारने १०० हेक्टरपर्यंतचे सर्व तलाव ग्रामपंचायतीना हस्तांतरण करुन त्यांच्या मच्छीसाठी लिलावाचा अधिकार ग्रामपंचायतीना दिल्याने लिलाव पध्दतीचा पैशांचा स्पर्धेमध्ये पारंपारिक मच्छीमार समाज तग धरु शकत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारंपरिक मच्छिमार समाजाच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०६-२०१७) :**(१) नाही.

पेसा नियम ३० नुसार गौणजल स्त्रोतांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार ग्रामसभांना देण्यात आलेला आहे.

पेसा नियम ३० (२) नुसार गावातील सर्व व्यक्तींना त्या गावातील भूप्रदेशांतर्गत स्थित असलेल्या जलस्त्रोतांमध्ये करारानुसार मासेमारी करण्याचा समन्यायी अधिकार असेल.

१०० हेक्टर पर्यंतचे तलावांचे उत्पादन व नफा नियम १४ नुसार स्थापन करण्यात आलेल्या ग्रामसभा कोष खात्यात जमा करण्यात येणार असून त्याचा लाभ पेसा गावातील सर्व नागरिकांना / पारंपारिक मच्छिमार समाजाला मिळणार आहे.

त्यामुळे पारंपारिक मच्छीमार समाज तग धरु शकत नाही असे म्हणता येणार नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण नगरपरिषदेचे (जि.पुणे) मोठया प्रमाणात नागरीकरण झाल्याने पिण्याच्या पाण्याची तुट जाणवत असल्याबाबत

**(९) ४७३७१ (०५-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण नगरपरिषदेचे (जि.पुणे) मोठया प्रमाणात नागरीकरण झाल्याने पिण्याच्या पाण्याची तुट जाणवत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भामा आसखेड धरणातून चाकण नगरपरिषदकरिता प्रति वर्ष ५७९७.२ MLD इतके पाणी आरक्षित ठेवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांस दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चाकण नगरपरिषदेस पिण्याच्या पाण्याकरिता भामा आसखेड धरणातून पाणी देण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :**(१) होय.
(२) होय. सदर निवेदन दि. ८/१२/२०१५ रोजी प्राप्त झालेले आहे.
(३) चाकण नगरपरिषदेस भामा आसखेड प्रकल्पातून वार्षिक ५.०२६ दलघमी एवढा बिगर सिंचन पाणी कोटा मंजूर आहे. वाढीव पाणी मागणी असल्यास तसा प्रस्ताव सादर करणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना क्षेत्रिय स्तरावरुन अवगत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामंपचातीमध्ये आरक्षित जागांवर उमेदवार मिळत नसल्याने सदस्य पद रिक्त राहत असल्याबाबत

**(१०) ५०५४१ (०६-०५-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत ही गावच्या विकासाचे नियोजन करणारी संस्था आहे मात्र या संस्थेत काही आरक्षित जागा वर्षानुवर्षे रिक्त राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड तालुक्यात तर २२ ग्रामपंचायतींमध्ये विविध प्रभागांमध्ये टाकलेल्या आरक्षणानुसार या जागांवर उमेदवारच मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामंपचातीमध्ये लोकांचे प्रतिनिधी नेमताना सदस्याची निवड करण्यासाठी गावातील समाजव्यवस्थेचा विचार करुन महिला, अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग, सर्वसाधारण अशा प्रकारचे आरक्षण निर्धारित करण्यात येते, मात्र या जागांवर उमेदवारच मिळत नसल्याने सदस्य पद रिक्त राहते तर काही ठिकाणी तर सरपंचपद सुद्धा रिक्त राहते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०७-२०१७) :**(१) रत्नागिरी जिल्हयातील १२२ ग्रामपंचायतीमधील १६४ पदे रिक्त आहेत. तर खेड तालुक्यातील १४ ग्रामपंचायतीमधील १९ पदे रिक्त आहेत.
(२) आरक्षित जागेवर अनुसूचित जाती जमातीचे उमेदवार मिळत नसल्याने या जागा रिक्त आहेत. या सर्व जागेंमध्ये दोन पेक्षा जास्त वेळा निवडणूक लावलेली आहे. तरीही निवडणूकीकरिता नामनिर्देशन पत्र प्राप्त न झाल्याने या जागा रिक्त आहेत.
(३) व (४) होय.

सदर रिक्त जागा महाराष्ट्र ग्राम पंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व जमातीसाठी जागा राखीव ठेवणे) नियम १९६६ मधील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांसाठी पर्यावरण विषयक परवानग्या मिळण्याबाबत**

**(११) ५५४२१ (२३-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प निर्मिती करण्यापूर्वी पर्यावरण कायदा १९८६ व अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २००६ रोजीचे उल्लंघन झाल्यामुळे जिल्ह्यातील ४० निर्माणधिन सिंचन प्रकल्पांना पर्यावरण विभागाने बंदी आणली असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पांसाठी पर्यावरण विषयक परवानग्या घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.
वाशिम जिल्ह्यात ६३ बांधकामाधीन प्रकल्प असून पर्यावरण मान्यतेबाबत ५७ प्रकल्पाचे TOR पर्यावरण विभागास सादर करण्यात आले होते. ४४ प्रकल्पाना पर्यावरण मान्यतेमधून सुट देण्यात आलेली आहे. १९ प्रकल्पांना पर्यावरण मान्यतेमधून सूट मिळणे बाकी आहे. यापैकी स्वासीन ल.पा.यो.ता. मंगरुळपीर जि.वाशिम या प्रकल्पाचे बांधकाम बंद करणेस्तव पर्यावरण विभागाचे दि.२७/०१/२०१६ चे पत्रानुसार निर्देश दिलेले होते. दि.२२/०६/२०१६ च्या पत्रान्वये या प्रकल्पाला पर्यावरण मान्यतेमधुन सूट देण्यात आलेली आहे.
(२) पर्यावरणविषयक परवानग्या घेण्याबाबतचे प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर करण्यात आले होते. सदर प्रकल्पांची सिंचन क्षमता २००० हेक्टर पेक्षा कमी असल्याने दि.२५/०६/२०१४ चे केंद्र शासनाचे निर्णयानुसार पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नसल्याने त्यांचेकडून सदर प्रकल्पांना सूट देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत्रा बागांच्या व्यवस्थापनाकरिता व लागवडीकरिता करण्यात येणारे काम मनरेगाच्या माध्यमातून करण्याबाबत**

**(१२) ६३७५२ (२०-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत्रा बागांच्या व्यवस्थापना व लागवडीकरिता करण्यात येणारे २२० दिवसांचे काम मनरेगाच्या माध्यमातून घेण्यात यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.कृषिमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संत्रा बागांच्या व्यवस्थापना करिता व लागवडीकरिता करण्यात येणारे २२० दिवसांचे काम मनरेगाच्या माध्यमातून घेण्यात येण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७) :**(१), (२), व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन महसुलमंत्री यांच्याकडे संत्रा बागांच्या व्यवस्थापनाकरिता व लागवडीकरिता शेतकऱ्यांची २२० दिवसांच्या कामाची मजुरी मनरेगाच्या माध्यमातून देण्याची मागणी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये केली होती.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी राज्यात केंद्राच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा-२००५ अनुसार सुरू आहे. या योजनेंतर्गत विशिष्ट प्रवर्गातील लाभर्थ्यांसाठी वैयक्तिक लाभाची कामे अनुज्ञेय आहेत. त्यामध्ये वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर फळबाग लागवड या कामाचाही समावेश आहे. फळबाग लागवडीअंतर्गत आंबा, संत्रा, आवळा, डाळींब, बोर, इत्यादी फळपिकांची लागवड व जोपासना करता येते. फळबाग लागवडीमध्ये पूर्व हंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड करणे, पाणी देणे, किटकनाशके/औषधे फवारणी व झाडांचे संरक्षण करणे ही कामे जॉब कार्ड धारक मजूर करु शकतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई उपनगरातील मार्वे मढगाव या पर्यटन स्थळी मुलभूत सुविधा देण्याबाबत

**(१३) ६५०४१ (२७-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मालाड पश्चिमेकडील मढ हे निसर्गरम्य ठिकाण असून तेथे देश विदेशातूनही पर्यटक येत असतात परंतु तेथे पर्यटकांसाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत सुविधा नाहीत तसेच कमी प्रमाणात बस सेवा असल्याने रहिवाशी व पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मार्वे मढ या पर्यटन स्थळी मुलभूत सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) मार्वे मढगाव हे ‘क’ वर्ग पर्यटन स्थळ आहे. या परिसरात पर्यटकांसाठी पुरुष व महिलांसाठी प्रत्येकी ५ शौचालये बांधण्यात आली आहेत. तसेच सदर परिसरात स्टार शौचालयांची निर्मिती, पर्यटकांसाठी प्रवासी जेट्टीचे बांधकाम,अक्सा बीच सुशोभिकरण आणि ७ व्होल्व्हो बसेसची खरेदी या कामांसाठी मंजुरी देण्यात आली असून ही कामे प्रगतीत आहेत. तर बेस्टमार्फत मालाड येथून बसमार्ग क्र.२७१ व बोरिवली येथून बसमार्ग क्र.२६९ या बससेवा सुरु आहेत.

---

### मुंबईसह राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर संरक्षक जाळी बसविण्याबाबत

**(१४) ६५१४५ (२७-०१-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील समुद्रकिनारे सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने सन २००६ मध्ये शासननिर्णय काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने मुंबई महानगरपालिका आणि पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयातील समुद्र किनाऱ्यांवर सुरक्षेबाबत अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे पत्र संबंधीतांना व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सागरी पर्यटन स्थळावर पोहायला जाणाऱ्या पर्यटकांचे मृत्यू रोखण्यासाठी समुद्र किनाऱ्यावर संरक्षक जाळी बसविण्याचा निर्णय घेवूनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार मुंबईसह राज्यातील सर्व किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०६-२०१७) :**(१) होय.

(२) नाही.

(३) व (४) राज्यातील नेमून दिलेल्या समुद्र किनाऱ्यांवर (बीचेस) पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबतच्या दि.८/९/२००६ च्या शासन निर्णयानुसार सुरक्षिततेच्या उपाययोजनांमध्ये समुद्र किनाऱ्यांवर संरक्षक जाळी बसविण्याचाही समावेश आहे. तथापि, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर (बीचेस) पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपाययोजनांसंदर्भातील दि.८/९/२००६ च्या शासन निर्णयास अनुसरुन मुंबईसह पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील नेमून दिलेल्या समुद्र किनाऱ्यांवर (बीचेस) प्रशिक्षीत जीवरक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्या असून स्वच्छतेसाठी व्यवस्था, धोक्याची सूचना

देणारे फलक, दिशादर्शक फलक, आपत्कालीन प्रसंगी प्रथमोपचारांसाठी आरोग्य केंद्रांची माहिती दर्शविणारे फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच शासनाने ठरवून दिलेल्या बीचेसवर सायरन, प्रकाश व्यवस्था/फ्लड लाईटस,टेहळणी मनोरे(वॉच टॉवर्स) बसविण्यात आले आहेत व बचावाचे साहित्यही उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कनवाड-म्हैशाळ (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१५) ६५८२८ (१६-१२-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कनवाड-म्हैशाळ (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा हा शिरोळ तालुका व मिरज तालुका यांना जोडण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून अवघ्या दोन महिन्यात संरक्षक कठडे तुटले असून बंधाऱ्याच्या बाजूला टाकलेला भराव वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०६-२०१७) :**(१) नाही. को. प. बंधारा म्हैसाळ बंधाऱ्यात पाणी साठवण करण्यासाठी बांधण्यात आला असून त्यावरून दुचाकी व हलक्या वाहनांचा वावर चालू आहे.

(२) नाही. को.प.बंधारा म्हैसाळ हा बंधारा कृष्णा नदीवर सन १९७२ या वर्षी बांधणेत आलेला आहे. बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण झाले पासून बंधाऱ्यात पाणीसाठा करणेत आला आहे.

सदर बंधाऱ्यास संरक्षक कठडे नसून संरक्षक दगड (Guard Stone) बसविणेत आले आहेत व भराव सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औढा (जि.हिंगोली) तालुक्यातील रोजगार हमी योजने अंतर्गत काम करणाऱ्या मजूरांना मजुरी मिळण्याबाबत**

**(१६) ६६२२३ (०९-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढा (जि.हिंगोली) तालुक्यातील वन विभागातंर्गत सन २०१५-१६ मध्ये झालेल्या रोजगार हमी योजने अंतर्गत काम करणा-या मजूरांना एक वर्ष झाले तरी मजूरी मिळालेली नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार मजुरांना प्रलंबित मजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७) :**(१), (२) व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत औंढा (जि.हिंगोली) तालुक्यातील वन विभागांतर्गत सन २०१५-१६ मध्ये झालेल्या कामांवरील मजुरीची रक्कम विहित कालावधीत संबंधीत मजुरांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. तथापि काही मजुरांच्या मजुरीची रु. ४२,००० (अक्षरी रूपये बेचाळीस हजार फक्त) इतकी रक्कम Rejected Transaction मुळे प्रलंबित होती. सदर रक्कम अदा करण्याच्या अनुषंगाने संबंधित मजूराचे बँक खाते आधार लिंक करण्याबाबत व खाते क्रियाशील करण्यासाठी खात्यावर व्यवहार करणे किंवा नवीन खाते काढण्याबाबत संबंधीत ग्राम रोजगार सेवक/ग्राम सेवक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत Rejected Transaction मुळे प्रलंबीत रु.४२,००० (अक्षरी रूपये बेचाळीस हजार फक्त) इतक्या रकमेपैकी रू.३४,०००/- इतकी मजूरीची रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरीत रक्कम अदा करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील १३ बंधाऱ्याच्या सर्वेक्षणाबाबत**

**(१७) ६६९१३ (०२-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाई धरण संघर्ष समिती सोबत झालेल्या बैठकीमध्ये समितीने सुचविलेल्या १३ बंधाऱ्याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व ठाणे जिल्हाचे पालकमंत्री यांनी माहे जुलै, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात जलसंपदा विभागाला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्वेक्षणाच्या आदेशान्वये कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) :**(१) होय.
(२) सदर सर्वेक्षणाचे आदेशा पूर्वीच मा.जलसंपदा मंत्री यांनी बोलाविलेल्या दिनांक २३/९/२००८ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या आदेशान्वये व शाई धरण विरोधी शेतकरी संघर्ष समितीने त्यावेळी दिलेल्या निवेदनानुसार व त्यांनी सुचविलेल्या अन्य १३ छोट्या बंधा-याचे सर्वेक्षण करण्यात आले, सर्व १३ बंधा-याचा एकूण पाणीसाठा २५.८५९ दलघमी येतो. शाई धरणाच्या

३५३.४१ दलघमी पाणीसाठयाचे तुलनेत सदर पाणीसाठा खूपच कमी असलेने व ठाणे जिल्हयाची वाढती पाण्याची गरज पाहता अन्य छोट्या बंधा-याच्या पर्यायापेक्षा शाई धरण बांधणे गरजेचे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नांही.

---

**मौ. सायवन ते घोडीपाडा, बेहडगांव (ता.जव्हार, जि.पालघर) या रस्त्यांच्या कामावर सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रोहयो मजूरांना कामाची मजूरी मिळण्याबाबत**

**(१८) ६६९९१ (०९-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सायवन ते घोडीपाडा, बेहडगांव (ता.जव्हार, जि.पालघर) येथील रस्त्यांच्या कामावर सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रोहयो मजूरांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमीच्या रस्त्याचे काम करुनही त्यांना कामाची मजूरी मिळाली नसल्याची बाब दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र रोजगार हमीवर काम करणा-या रोहयो मजूराला १८१ दिवसभराची मजूरी देणे बंधनकारक असतांना मजूरांना फक्त ७० ते ८० रुपये दिले गेल्यामुळे मजूरांनी केलेल्या कामाचा मोबदला मिळण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांच्याकडे लेखी तक्रारी करुनही आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकल्पाची शासनाने चौकशी केली आहे काय व व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार रोहयो योजनेची प्रलंबित मजूरी मजुरांना मिळण्याबाबत व मजूरी प्रलंबित ठेवणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

सदर कामाची मजुरी कामाच्या मोजमापानुसार दि. ८ ऑगस्ट, २०१६ रोजी अदा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामावर रुपये २,३७,०४१/- इतका अकुशल खर्च झाला असून मजुरांनी केलेल्या कामाच्या मोजमापानुसार प्रत्येक मजुरास सरासरी रुपये १४५/- प्रतिदिन मजुरी मिळाली आहे. सदर कामावर मजुरांना रु.७०/- ते ८०/- अशी कमी मजुरी मिळाली असल्याबाबत कोणतीही लेखी तक्रार दि.८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झालेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोदवड परिसर उपसा सिंचन (ता.बोदवड, जि.जळगाव) योजनेची प्राथमिक कामे सुरू करण्यास निधी मिळण्याबाबत**

**(१९) ६७७०० (०२-०१-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड परिसर उपसा सिंचन (ता.बोदवड, जि.जळगाव) योजनेची प्राथमिक कामे सुरू करण्यास आवश्यक मान्यता तसेच केंद्र शासनाकडे सन २०१४-१५ साठी निधी वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी जलसंपदा विभागाकडे पाठविलेला असून सदर प्रस्तावास अद्यापही मान्यता दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, प्रलंबित असलेल्या बोदवड उपसा सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) बोदवड परिसर उपसा सिंचन योजना (ता.बोदवड, जि.जळगांव) या प्रकल्पास रुपये २१७८.६७ कोटी इतक्या किंमतीचे काम सुरु करण्याच्या प्रस्तावावर दिनांक ३/१/२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार या उपसा योजनेचे काम सुरु करणेस काही अटींच्या अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

बोदवड उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा अर्थसहाय निधी (Grant in aid) हा विशिष्ट प्रकल्पासाठी असल्याने मा.राज्यपाल महोदयांच्या सिंचन क्षेत्रासाठी निधी वितरण सुत्राबाहेर ठेवण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १५/४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार, मोखाडा (जि.पालघर) या डोंगराळ भागातील आदिवासी रोजगारासाठी स्थलांतर करीत असल्याबाबत**

**(२०) ७०८६६ (१६-१२-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा (जि.पालघर) या डोंगराळ भागातील आदिवासी कुटुंबियांसह रोजगारासाठी मोठया संख्येने ठाणे, कल्याण, भिवंडी, मुंब्रा आणि अन्य ठिकाणी स्थलांतर करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हयातील ग्रामीण विभागातील आदिवासी बांधवांना नियमित रोजगार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याबाबत**

**(२१) ७०८७३ (०९-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समुद्र किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेबाबत व किनारपट्टीची देखरेख व सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याचा अध्यादेश सन २०१६ मध्ये शासनाने काढलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबईसह कोकणातील सर्व किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील मुरुडच्या किनारपट्टीवर पुणे येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा बुडून मृत्य झाल्यानंतर किनार पट्टीवरील सुरक्षेचा मुद्दा मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने किनारपट्ट्यावरील सुरक्षेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याचा खुलासा ३ महिन्यात करावा असे आदेश शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित विभागातील बहुसंख्य सरकारी यंत्रणांनी फक्त धोक्याच्या सूचना देणारे फलक किनाऱ्यावर लावले असून बऱ्याच ठिकाणी कायमस्वरुपी फलक लावण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने पर्यटकांच्या सुरक्षेबाबत तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०६-२०१७) :**(१) राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर(बीचेस)पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, दि.८/९/२००६ अन्वये सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत.

(२) शासनाने ठरवून दिलेल्या बीचेसवर सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) होय.

(४) राज्यातील ठरवून दिलेल्या समुद्र किनाऱ्यांवर (बीचेस) धोक्याच्या सूचना देणाऱ्या फलकांबरोबरच माहिती फलक/दिशादर्शक फलक, आपतकालीन प्रसंगी प्रथमोपचारासाठी आरोग्य केंद्रांची माहिती याबाबतचे माहिती फलकही लावण्यात आले आहेत. तसेच या बीचेसवर जीव सुरक्षा रक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्या असून, सायरन, फ्लड लाईटस्, टेहळणी मनोरे बसविण्यात आले आहेत व बचावाचे साहित्यही उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हात उर्वरित वैधानिक विकास मंडळाकडून मंजूरी दिलेल्या व अपूर्ण राहिलेल्या कामांना निधी मिळण्याबाबत**

**(२२) ७११६२ (१६-१२-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात उर्वरित वैधानिक विकास मंडळाकडून सन २००८-२००९, २००९-१० व २०१०-२०११ या वर्षातील मंजूरी दिलेल्या तथापि अपूर्ण राहिलेल्या कामांना निधी मिळणेबाबतची मागणी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ व तद् नंतर अनेक वेळा मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०१७) :**(१) व (२) प्रश्नात उल्लेखिलेल्या दिनांक २६.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेल्या अशा मागणीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून कामांबाबतची आवश्यक ती माहिती मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील जमीन ओलीताखाली आणण्यासाठी तिरु नदीवर १० बॅरेजेस बसविण्यासाठी निधी देण्याबाबत**

**(२३) ७१६७१ (१६-१२-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलीताखाली आणण्यासाठी तिरु नदीवर १० बॅरेजस बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन दयावा अशी मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही तालुक्याला पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी तिरु नदीवर १० बॅरेजेस बसवून पाणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन दयावे असे निवेदन लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तिरु नदीवर बॅरेजेस बसविण्यासाठी निधी देण्यासह पाणी प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) :**(१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यात तिरु नदीवर १०० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेल्या (स्थानिक स्तर योजना) १० कोल्हापुरी बंधारे योजनांची कामे लघु पाटबंधारे जिल्हा परिषदेमार्फत पुर्ण झालेली आहेत. अस्तित्वात असलेल्या सदर कोल्हापुरी बंधा-यांचे (स्थानिक स्तर योजना) १०० हे. पेक्षा कमी सिंचन क्षमता असल्यामुळे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याचा खर्च विहित मापदंडात बसत नाही. त्यामुळे बॅरेजेसला अद्याप मंजुरी नाही. तसेच नवीन प्रकल्प हाती घेण्यास मा.राज्यपाल महोदयांचे निर्बंध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नांही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे पंचायत समीतीची नवी इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२४) ७१७०७ (०५-०१-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथील पंचायत समीतीची इमारत जूनी व निजामकालीन असून या इमारतीच्या भिंती व छत पूर्णत: पडून गेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात यावी यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली असून त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारत बांधण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) उद्‌गीर पंचायत समितीचे अस्तित्वातील बांधकाम मोडकळीस आल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट, जागा मालकीचा उतारा, ले-आऊट प्लॅन इत्यादी कागदपत्रांच्या पुर्ततेसह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून प्रतिक्षाधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांडोली (ता.खेड, जि.पुणे) येथे अनुसूचित जाती व नव बौद्ध मुलींसाठी बांधलेले वसतिगृह वापरासाठी खुले न केल्याबाबत**

**(२५) ७१७७० (१०-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांडोली (ता.खेड, जि.पुणे) येथे अनुसूचित जाती व नव बौद्ध मुलींसाठी बांधलेले वसतिगृह व निवासी शाळेच्या इमारतीचे दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास उद्घाटन होऊन २ वर्षे झाली तरी सदर वसतिगृह व निवासी इमारत वापरासाठी खुले करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहामध्ये मुलींना प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय,सदर वसतिगृहाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे, सदर अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींसाठीची शासकीय निवासी शाळा, चांडोली ता. खेड, जि.पुणे ही दि.१४ ऑगस्ट, २०१५ पासून सुरु झालेली आहे.

(२) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ७ विद्यार्थीनी प्रवेशित होत्या व शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये सद्यस्थितीत ५५ विद्यार्थीनी प्रवेशित आहेत.

(३) सदर निवासी शाळेच्या एकूण ३ इमारती असून २ इमारती ह्या अपूर्णावस्थेत आहेत. एका इमारतीचे काम पूर्ण झालेले असून शासकीय निवासीशाळा व वसतिगृह सदर इमारतीत चालु आहे. इतर दोन इमारतींची विकासकामे प्रगतीत आहेत.

---

**पूर्णत्वाचा दाखला घेतल्याशिवाय बांधकामाच्या कोणतीही नोंद करण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश असतानाही चाकण ग्रामपंचायतीने नोंदी केल्याबाबत**

**(२६) ७३१८६ (०५-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत क्षेत्रात बांधकामाच्या नोंदी करण्यापूर्वी उपविभागीय अधिकारी खेड यांचे कडील पूर्णत्वाचा दाखला घेतल्याशिवाय कोणतीही नोंद करण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश असतानाही तत्कालीन ग्रामपंचायत (ता.खेड, जि.पुणे) यांनी दिनांक ९ मार्च,२०१५ रोजीच्या मासिक सभेतील ठराव क्र. ६२७/२/६,६२७/२/१३,६२७/३/१३ नुसार एकूण २६५४ अनधिकृत नोंदी केल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची कोणतीही परवानगी न घेता संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने उक्त नोंदी तात्काळ रजिस्टरमध्ये करण्यात आल्या असून त्याची दस्त नोंदणी न केल्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार जिल्हापरिषदेचे गटविकास अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०७-२०१७) :**(१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, कलम १२४ नुसार गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधीन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषी आकारणीस अधीन नाहीत) यावर ग्रामपंचायतीस कर बसविण्याचा अधिकार आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायतींच्या हद्दीतील मिळकतींवर विहीत पद्धतीने कर आकारणी करुन वसुली करण्यात येते. याकरिता करपात्र मिळकतींच्या नोंदी ग्रामपंचायतीकडील नमुना नं. ८ मध्ये, म्हणजेच कर आकारणी नोंदवहीमध्ये घेण्यात येतात.

तत्कालिन ग्रामपंचायत चाकण (ता.खेड, जि.पुणे) यांनी दिनांक ९ मार्च, २०१५ रोजीच्या मासिक सभेतील ठराव क्र. ६२७/२/६, ६२७/२/१३, ६२७/३/१३ नुसार एकूण २६५४ नोंदी केल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीनुसार नोंदी करताना झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित ग्रामविकास अधिकारी यांना जिल्हा परिषद, पुणे यांच्या दि. २९/०७/२०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून, खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तत्कालिन सरपंच व सदस्य यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, त्याबाबतचे खुलासे प्राप्त झाले आहेत. खुलाशांची पडताळणी केली असता, सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उक्त २६५४ नोंदींबाबत तपासणी करुन गैरव्यवहार आढळून आल्यास संबंधित सरपंच / उपसरपंच / सदस्य आणि ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करणेबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.

तसेच, ग्रामपंचायत चाकण यांनी ज्या करारनाम्याच्या नोंदी केलेल्या आहेत त्या करारनाम्यांबाबत शासनास महसूल बुडाला किंवा कसे? याबाबत स्वतंत्र चौकशी/शहानिशा करणेबाबत संबंधित सह जिल्हा निबंधक वर्ग १ (निम्न श्रेणी), पुणे यांना कळविण्यात आले आहे.

---

### कर्नाटक व आंध्रप्रदेशात वाहून जाणारे कृष्णा नदीचे पाणी महाराष्ट्राला देण्याबाबत

**(२७) ७३९७६ (१५-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राला दुसऱ्या पाणी तंटा लवादाने दिलेल्या ६६६ टि एम सी पाण्यापैकी काही पाणी मिळावे म्हणून तेलंगण व आंध्र प्रदेश राज्यांनी दाखल केलेली याचिका दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृष्णा नदीच्या ६६६ टि एम सी पाण्यावर महाराष्ट्राचा संपूर्ण हक्क असताना त्यापैकी बरेच पाणी न अडविल्यामुळे व त्याचा वापर होत नसल्यामुळे कर्नाटक व आंध्र प्रदेशात वाहून जाते,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणी अडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) :**(१) नाही.

आंध्रप्रदेश पुनर्गठन अधिनियम २०१४ मधील कलम ८९ च्याअनुषंगाने केंद्र शासनाने द्वितीय कृष्णा पाणी तंटा लवादाकडे सोपविलेल्या जबाबदारीची/ संदर्भाची व्याप्ती (Scope of Reference) ठरविण्याबाबत द्वितीय कृष्णा पाणी तंटा लवादाने दिलेला दि. १९/१०/२०१६ चा निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी तेलंगणा राज्याने डिसेंबर २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली होती. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९/०१/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सदर याचिका फेटाळली आहे.
(२) नाही.

आंतरराज्यीय नदी पाणी तंटा अधिनियम-१९५६ अंतर्गत अनुच्छेद ६ मधील तरतुदीनुसार द्वितीय कृष्णा पाणी तंटा लवादाचा निवाडा केंद्र शासनाच्या राजपत्रात अद्याप अधिसूचित न झाल्याने त्याची अंमलबजावणी करता येत नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादाचा निवाडा अंमलात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे (जि.धुळे) तालुक्यातील अक्कलपाडा कालव्यातील पाणी गोंदूर एम.आय.टँक मध्ये सोडण्याबाबत

**(२८) ७४४९५ (१७-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे (जि.धुळे) तालुक्यातील निम्नपांझरा (अक्कलपाडा) प्रकल्प जवळपास पूर्णत्वास आला असून सदर प्रकल्पास पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून अर्थसहाय्य घोषित झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निमडाळे व गोंदूर या दोन गावांचा या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समावेश झालेला नाही त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून त्यांनी अक्कलपाडा डावा कालवा संपतो तेथून जवळ असलेल्या निमडाळे गावाकडे जाणारा नाला या कालव्यातून सदर

नाल्यात पाणी सोडल्यास, निमडाळे, के.टी.वेअर भरुन पुढे गोंदूर एम.आय.टँक मध्ये पाणी सोडावे अशी येथील ग्रामस्थांची मागणी असून याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) अक्कलपाडा धरणाच्या मूळ मंजूर जलनियोजनात उक्त मागणी पूर्ण करण्यासाठी अतिरीक्त पाण्याची तरतूद नसल्याने, सदर मागणीची पूर्तता करता येत नाही. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### निम्न पांझरा (जि.धुळे) प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून देऊर बु. परिसरातील उमराड नाल्यात पाणी टाकण्याबाबत

**(२९) ७४७२४ (२०-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे मध्यम प्रकल्प विभागांतर्गत येणा-या निम्न पांझरा (अक्कलपाडा) प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचा देऊन बु. व देऊन खु. उभंड, नांद्रे आणि परिसरात प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने शेतक-यांनी उजव्या कालव्यातून देऊर बु. परिसरातील उमराड नाल्यात पाणी टाकण्याबाबत कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग, धुळे यांच्याकडे मागणी केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीवर शासनाने निर्णय घेऊन उमराड नाल्यात पाणी टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७)** :(१) होय.

(२) व (३) अक्कलपाडा धरणाच्या मूळ मंजूर जलनियोजनात उक्त मागणी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त पाण्याची तरतूद नसल्याने, सदर मागणीची पूर्तता करता येत नाही.

---

### पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मोरणा गुरेघर या मध्यम धरणातून उपसा जलसिंचन योजनेद्वारे शेतीला पाणी देण्याबाबत

**(३०) ७४९६३ (१७-०४-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत मोरणा गुरेघर या मध्यम धरण प्रकल्पाचे काम सध्या पुर्णत्वाकडे गेले असून सदर धरणामध्ये पुर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येऊ लागला असून या धरण प्रकल्पातंर्गत या विभागातील शेतीकरीता कालव्याच्या माध्यमातून पाणी देणेकरीता धरणाच्या डाव्या व उजव्या तीरावरुन कालव्याच्या कामास सुरुवात ही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या दोन्ही कालव्यांच्या कामाचा सर्व्हे हा मुळातच चुकीचा झाला असल्याने या कालव्यातील पाणी डोंगराकडेला वसलेल्या अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीला मिळत नसल्याने दोन्ही तीरावरील कालव्यांच्या कामांचा फेर सर्व्हे होऊन या विभागातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या शेतीला जलसिंचनाच्या माध्यमातून पाणी देण्याबाबत शासनाने मान्यता द्यावी याकरीता मा.जलसंपदामंत्री यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.जलसंपदा मंत्री यांनीही या कामांचे फेरसर्व्हे करण्यात यावेत अशा लेखी सुचना कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोरणा धरणातून शेतकऱ्यांच्या शेतीला जलसिंचनाच्या माध्यमातून पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७)** :(१) होय.

(२) फेरसर्व्हे करणेची मागणी केली आहे.

(३) होय.

(४) क्षेत्रिय स्तरावर सर्वेक्षण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**झरी उपसा सिंचन (ता. अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया) प्रकल्पाचे काम पुर्ण करणेबाबत**

**(३१) ७५३७१ (१७-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी उपसा सिंचन (ता.अर्जुनी मोरगांव, जि.गोंदिया) योजनेकरीता २२७५ लागवडी क्षेत्र आवश्यक असून हे नवीन क्षेत्र धापेवाडा टप्पा-२ अंतर्गत येत असल्यामुळे या योजनेचे लाभक्षेत्र धापेवाडा टप्पा-२ किंवा झरी उ.सिं.यो. यापैकी कोणत्या योजनेत घेणार, यासंबंधी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश मंडळ कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता, उ.सिं. प्रकल्प विभाग, तिरोडा (जि.गोंदिया) यांना दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिकतर्फे नियोजन कार्यक्रमान्वये या उपसा सिंचन योजनेकरीता आवश्यक संकल्पने प्राप्त होण्यास अधिक विलंब होत असून सदर संकल्पने किती कालावधीत प्राप्त होतील,

(३) असल्यास, लागवडी योग्य क्षेत्र ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने झरी उपसा सिंचन योजना तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) झरी उपसा सिंचन प्रकल्पामधील प्रस्तावित २२७५ हेक्टर क्षेत्र धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्प-२ प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट आहे. धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. झरी प्रकल्पाच्या लाभचेत्राचे सिंचन धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा २ द्वारे होणार आहे. त्यामुळे झरी उपसा सिंचन प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्प-२ प्रकल्प तीन चरणात पुर्ण करण्याचे प्रस्तावीत आहे.प्रथम चरणातील कामे पूर्ण झालेली आहेत.पुढील चरणाच्या कामासाठी शासनाची मंजूरी प्राप्त झाली आहे.चरण-२ अंतर्गत कामे ३ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजीत आहे. त्यानंतर चरण ३ ची कामे हाती घेण्यात येणार आहेत. झरी उपसा सिंचन योजनेचे लाभक्षेत्र धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ च्या चरण ३ मध्ये समाविष्ट आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागेल त्याला शेततळे' या योजनेनुसार शेततळी उभी करण्याकरिता दोन वेळा मुदतवाढ देऊनही काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३२) ७५३९२ (१५-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) 'मागेल त्याला शेततळे' या योजनेनुसार राज्यात एक लाख अकरा हजार १११ शेततळी उभी करण्याकरिता दोन वेळा मुदतवाढ देऊनही काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, कृषी कार्यालये, लघू पाटबंधारे, पंचायत समित्याच्या कृषी विभागांना दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास रोहयोचे उपसचिव यांनी राज्यात १ लक्ष ११ हजार १११ शेततळी दिनांक ३० जून, २०१७ रोजीपूर्वी पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या गावांची पैसेवारी ५० पेक्षा कमी आहे अशा गावांचाही समावेश मागेल त्याला शेततळे योजनेत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७) :**(१) “मागेल त्याला शेततळ” योजनेचा उद्दिष्ट पुर्ततेच्या दृष्टीने दिलेल्या मुदतीत सर्व महसूली विभागांमध्ये लक्षांकाच्या दिडपट अर्ज प्राप्त न झाल्याने योजने अंतर्गत अर्ज Upload करण्यास तीन वेळा मूदतवाढ देण्यात आली. सद्यस्थितीत दि. १८ मे, २०१७ च्या देकि अहवालानुसार योजनेअंतर्गत १०४५९७ शेततळ्यांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला असून ३३४४० कामे पूर्ण झाली आहेत व १२४५६ कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) होय.

(३) होय, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मागेल त्याला शेततळे या योजनेमधील ५० पैसे आणेवारीची अट शिथिल करुन ही योजना राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३३) ७६२८७ (१५-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील लिंबोटी धरणाचे सर्व दरवाजे जूनमध्ये झालेल्या अतिवृष्टीत अभियंत्याच्या चुकीमुळे उघडे राहिल्याने शेतकऱ्यांची पिके वाहून गेल्यामुळे त्यांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारुळ, तेलूर, राहटी, वेल्लूर, जाकापूर, कौठा, शिरुर आदि गावात संबंधित ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक यांनी सदर घटनेचा पंचनामा करुन पाच महिने झाले तरी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांना मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) :**(१) दि.३०/०९/२०१६ चे मध्यरात्रीपासून लिंबोटी धरणाचे पाणलोट क्षेत्रात सूरू झालेल्या अतिवृष्टीमुळे (१५४.२३ मि.मी.) जलाशय पूर्ण क्षमतेने भरल्याने १८२७.६६ घ.मी. प्रति सेकंद एवढा महत्तम विसर्ग नदी पात्रात सोडण्यात आला. या काळात दरवाजे उघण्याबाबत अभियंत्याची चूक झाली नाही. यामुळे मार्गदर्शक बांध फुटून लगतचे ०.३५ हे. जमिनीचे झालेले नुकसान काळी माती टाकून भरून देण्यात आले आहे. तथापि शेतकऱ्यांची पिके वाहून होणाऱ्या नुकसानीबाबत पुढील कार्यवाही महसूल विभागाकडून करण्यात येत आहे.

(२) महसूल विभागाकडून कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(३) महसूल विभागाकडून कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील उन्हेरे येथील कुंड व विठ्ठल रूक्मिणी मंदिरात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३४) ७६५१४ (१५-०४-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील श्री क्षेत्र बल्लाळेश्वर पाली शहारापासून २ कि.मी. अंतरावर असलेले उन्हेरे येथील प्रसिद्ध गरम पाण्याचे झरे असलेले कुंड व विठ्ठल रूक्मिणीचे ऐतिहासिक मंदिर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुंडाकडे जाण्याच्या मार्गावर दिशादर्शक फलक नसल्याने व विठ्ठल रूक्मिणी मंदिर येथे पर्यटकांसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उन्हेरे येथील गरम पाण्याच्या कुंडाच्या मार्गावर दिशादर्शक फलक लावण्याबाबत व इतर सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०६-२०१७) :**(१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) उन्हेरे येथील गरम पाण्याच्या कुंडाकडे जाणाऱ्या मार्गावर दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. सदर ठिकाणी भक्त निवास, शौचालय, पाणी पुरवठा, जोडरस्त्यांची सुधारणा, पथदिवे लावणे अशा सोयी सुविधा पुरविण्यासाठी कार्यकारी अभियंता (बांधकाम), रायगड जिल्हा परिषद यांनी रू.९९ लक्ष किंमतीच्या कामांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला आहे.

---

**केंद्रीय जीएसटी कायदयानुसार समुद्र किना-यापासून १२ सागरी मैलांच्या प्रदेशात होणा-या व्यापारावरील कर वसूल करण्याचे हक्क केंद्र शासनाकडे जाणार असल्याबाबत**

**(३५) ७६९१३ (१९-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय जीएसटी कायदयानुसार समुद्र किना-यापासून १२ सागरी मैलांच्या प्रदेशात होणा-या व्यापारावरील कर वसूल करण्याचे हक्क केंद्र शासनाकडे जाणार असल्याने महसूलामध्ये घट होवून राज्य शासनाचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाचे सदर प्रकरणी एकूण किती महसूलाचे नुकसान होणार आहे व सदर नुकसान भरपाई रक्कम मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) तसेच केंद्र सरकारने, नुकसान भरपाईपोटी, राज्य सरकारला, किती महसूली रक्कम देण्याचे मान्य केले आहे तसेच, निश्चलनीकरणानंतर राज्याच्या महसूलात झालेली घट विचारत घेता, केंद्र शासनाने, महाराष्ट्र राज्यास किती वाढीव नुकसान भरपाई रक्कम मंजूर करून, उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे,
(४) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
वस्तू व सेवा कर कौन्सिलच्या दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये १२ सागरी मैलापर्यंतची सीमा केंद्र शासनाच्या अखत्यारीत असली तरी त्या सीमेपर्यंत होणाऱ्या व्यवहारावर केंद्र शासन राज्य शासनास कर गोळा करण्याचा अधिकार प्रदान करेल असा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) लागू नाही.
(३) संविधान (एकशे एक सुधारणा) कायद्यानुसार जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर ५ वर्षे केंद्र शासन राज्य शासनास नुकसान भरपाई देणार आहे. संशोधन व त्या संबंधात केंद्राने राज्यास द्यावयाच्या नुकसान भरपाई देण्याबाबतचा कायदा पारीत केला आहे. नुकसान भरपाईची रक्कम जीसएटीची अंमलबजावणी केल्यानंतर निश्चित होणार असल्याने त्याबद्दल नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.
(५) लागू नाही.

---

**नागपूर सालई मोकासा (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील लघू तलावास डब्ल्यु.एम.आर.ची मंजुरी देण्याबाबत**

**(३६) ७८२१७ (१५-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर सालई मोकासा (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील लघू तलावास डब्ल्यु.एम. आर.ची मंजुरी देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे काय आहे,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७) :** (१) होय.
(२) सदर योजनेस म.ज.नि.प्रा. कलम-११ (च) अंतर्गत अंतिम मान्यता आवश्यक असून प्रादेशिक कार्यालयाचे पत्र दिनांक २५/११/२०१६ अन्वये प्रस्ताव म.ज.नि.प्रा.यांना सादर करण्यात आलेला होता.

म.ज.नि.प्रा.चे पत्र दिनांक २०/१२/२०१६ अन्वये सदर प्रस्ताव परत करण्यात आला असून, प्रकल्पास वन व पर्यावरण मंत्रालयाची अंतिम मान्यता व एकात्मिक जल आराखडयास रितसर मंजुरी मिळाल्यानंतर कलम-११ (च) अंतर्गत अंतिम मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत.

राज्य जल परिषदेकडून गोदावरी खोऱ्यासह एकात्मिक राज्य जल आराखडा अंतिम करण्याचे दृष्टीने शासन निर्णय दिनांक १२/४/२०१६ अन्वये तज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून सदर समिती तर्फे आराखडा अंतिम करण्याचे दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाट (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथे रस्त्याच्या तळाच्या कामाकरिता निधीची मिळण्याबाबत**

**(३७) ७८७१० (१५-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाट (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथे रस्त्याच्या लगतचे सुमारे ६ एकर क्षेत्रामध्ये पसरलेले प्राचीन नैसर्गिक तळयाकडे पर्यटनदृष्या दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तळयाचा विकास झाल्यास भोगवे, किल्ले निवती, मालवण, देवबाग, वेंगुर्ले या समुद्र किनारपटटीवरुन जाणारे पर्यटक या तळयाकडे आकर्षित होतील व आर्थिक वाढ होवून बेरोजगारांना रोजगार मिळेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावासंदर्भातील प्रस्ताव व परिपूर्ण आराखडा तयार करण्यात आला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदर तलावाच्या कामाकरिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पाट तलाव सुशोभिकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१६-२०१७ या वर्षात 'क' वर्ग पर्यटन विकास योजनेअंतर्गत रू.२५ लक्ष एवढी तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्जुना (जि.रत्नागिरी) धरणाच्या कालव्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत**

**(३८) ७८९४९ (१७-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुना (जि.रत्नागिरी) धरणाच्या कालव्याचे गत ३ वर्षापासून निधी अभावी प्रलंबित काम आता निधी उपलब्ध होवूनही अत्यंत संथ गतीने सुरु असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदशर्नास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धरणाच्या कालव्याच्या कामाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीनुसार सदर कालव्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१७)** :(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रकल्पाच्या कालव्यांची उर्वरित कामे तातडीने पुर्ण करणेच्या दृष्टीने प्रकल्पास प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत केंद्रिय अर्थसहाय्य प्रस्तावित आहे. सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पात रू.५०.०० कोटी तरतूद असून निधी उपलब्धतेनूसार सन २०१९-२० मध्ये प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील दहीगांव उपसा सिंचन कामाकरिता कायमस्वरुपी अभियंत्याची नेमणूक करण्याबाबत**

**(३९) ७९५३१ (१५-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील दहीगांव उपसा सिंचनखालील लाभक्षेत्र १०,५०० हेक्टर असतांना एकच पूर्णवेळ अभियंता व दोन अर्धवेळ अभियंते कार्यरत असल्यामुळे त्यांच्यावर कामाचा ताण वाढत असल्याने सिंचनाच्या कामकाजावर विपरित परिणाम होत असल्यामुळे या ठिकाणी कायमस्वरुपी २ अभियंत्याची नेमणूक करणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २० जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी सध्या पूर्णवेळ ०३ अभियंते कार्यरत असून दोन अभियंते अतिरिक्त कार्यभाराद्‌वारेही कार्यरत आहेत. यामुळे सिंचनाच्या कामावर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मानव विकास मिशन निधि अंतर्गत गडचिरोली जिल्हयातील गोंडवण कला दालनच्या बाजुला चुकीच्या पद्धतीने बांधण्यात आलेल्या गाळ्यांबाबत**

**(४०) ८०१७६ (१४-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानव विकास मिशन निधितून गडचिरोली शहरातील गोंडवण कला दालनच्या बाजुला लाखो रुपये खर्चून दुकान गाळे बांधण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळे चुकीच्या पद्धतीने बांधण्यात आल्याने ते कोणत्याही ग्राहकांनी व्यवसाय करण्यासाठी स्वीकारले नाही त्यामुळे त्याठिकाणी गुरे-ढोरे, डुक्कर, शेळी या सारख्या प्राण्यांची वस्ती वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर गाळयांच्या ठिकाणी गुरे-ढोरे, डुक्कर, शेळी यासारख्या प्राण्यांची वस्ती वाढलेली नाही.

(३) सदरहू १२ गाळयांपैकी, २ गाळे कार्यालयीन वापरासाठी असून एक गाळा वन विभागाला तात्पूरत्या स्वरुपात मध व वनौषधी विक्रीकरिता उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरित बंद असलेले गाळे सुरु करण्याकरिता गडचिरोली जिल्हयातील कार्यरत बचत गट व खाजगी संस्था तसेच ग्रामीण भागातील कारागिरांना, त्यांनी हस्तकला कौशल्याने निर्माण केलेल्या वस्तुंची विक्री करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता सदर गाळे भाडेतत्वावर देण्यासाठी मानव विकास समिती गडचिरोली हे कार्यालय प्रयत्नात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदी नदी (ता.नांदगाव, जि.अमरावती) प्रकल्पांतर्गत पिंपळगाव निपाणी-पळसमंडळ-जावरा मोळवण ते नांदगाव खंडेश्वर रस्ता प्रजिमा-३०-कालवा ओलांडणी पूलाचे पोच रस्त्याकरिता निधी मिळण्याबाबत**

**(४१) ८१७०४ (२०-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदी नदी (ता.नांदगाव, जि.अमरावती) प्रकल्पांतर्गत पिंपळगाव निपाणी-पळसमंडळ-जावरा मोळवण ते नांदगाव खंडेश्वर रस्ता प्रजिमा-३०-कालवा ओलांडणी पूलाचे पोच रस्त्याच्या बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास ठेव स्वरुपास निधी उपलब्ध करुन देणेबाबत अधिक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, अमरावती यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाच्या पोच रस्त्याच्या बांधकामाकरिता निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१७) :**(१) होय.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेल्या पर्यायाऐवजी भुसंपादन करुन भरावाचा पोच मार्ग करण्याचे काम जलसंपदा विभागामार्फत करणे बचतीचे असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागास ठेव निधी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा (जि.वाशिम) येथील गुरु मंदिर व जैन मंदिर याना पर्यटन विकासाच्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला मान्यता मिळण्याबाबत**

**(४२) ८१९५४ (१५-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा जिल्हा वाशिम येथील नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्था व जैन समाजासाठी सभागृहाच्या बांधकामाचा तसेच पार्किंगच्या कामाचा सुधारित प्रशासकिय मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे जिल्हा प्रशासनानी दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०६-२०१७) :**(१) होय.दिगंबर जैन मंदिर,कारंजा येथील सभागृहाचे बांधकाम करणे व नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान येथे पार्किंग व्यवस्था करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सादर केला होता.
(२) व (३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. टीडीएस-२०१७/३/प्र.क्र.२७४/ पर्यटन, दि.३०/३/२०१७ अन्वये कारंजा शहरातील जैन सामाजिक सभागृह व गुरु मंदिर येथे वाहनतळ या कामासाठी अनुक्रमे रू.७५ लक्ष व रू.५० लक्ष एवढ्या किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या दोन्ही कामांसाठी अनुक्रमे सदर शासन निर्णयान्वये रू.२० लक्ष व रू.१० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

---

**गायवळ (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील प्रकल्पातील बुडती क्षेत्रात दिव्पथ विद्युत वाहिनीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ८२४१२ (२०-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गायवळ (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील सिंचन प्रकल्पाचा बुडती क्षेत्रात १३२ केव्ही दिव्पथ विद्युत वाहिनीचे काम गेल्या अनेक वर्षापासून हस्तांतरणासाठी महावितरणाकडे प्रलंबित असून या बाबीचे जलसंपदा विभागाने दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास १ कोटी ७८ लाख ९३ हजार ३०४ रुपयाचा भरणा धनादेश क्र.१३४५३३ नुसार कार्यकारी अभियंता अती उच्च दाब विभाग अकोला यांच्याकडे केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाचा भरणा करून सुद्धा अद्यापपर्यंत कोणतेही हस्तांतरणाचे काम सुरु झाले नसल्यामुळे या भागातल्या शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या पाण्याचा सिंचनासाठी फायदा मिळणे अशक्य होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकरीचा सिंचनाचे पाणी तात्काळ मिळण्याबाबत व सदर काम त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१७) :**(१) होय.
(२) होय.

विद्युतवाहिनी स्थानांतरणाचे काम पुर्ण न झाल्याने अद्याप घळभरणी होवु शकली नाही.
(३) विद्युतवाहिनी स्थानांतरणाचे काम सुरु असून ते पुर्ण करण्यासाठी सतत पाठपुरावा सुरु आहे. प्रकल्पाची घळभरणी जून २०१७ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे. घळभरणीनंतर शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ घेता येणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील झोडगा शेतशिवारात तलाव बांधूनसुध्दा जमीन सिंचनापासून वंचित असल्याबाबत

**(४४) ८२५१४ (१७-०४-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील झोडगा शेतशिवारात सन १९८६ ला लघुपाटबंधारे विभागामार्फत ३६१ हेक्टर सिंचन क्षमतेचा तलाव बांधून १९८६ पासून कार्यान्वित केला असतानाही गेल्या ३० वर्षांपासून २५२ हेक्टर जमीन सिंचनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे म्हणून सतत पाठपुरावा करूनही शेतक-यांना पाणी उपलब्ध करून देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गावांतील १९७ खातेदार यांच्या २५२ हेक्टर जमीन अद्याप सिंचनापासून वंचित असल्याची कारणे काय आहेत ,
(४) असल्यास, या जमिनीला पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७) :**(१) होय.

(२) अशंत: खरे आहे.

(३) सदर कालवा मुरमाड भुस्तरातुन टेकडीच्या बाजूने जात असल्यामुळे कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा पाझर होतो, त्यामुळे निर्मित सिंचन क्षमते एवढे सिंचन होऊ शकत नाही. तसेच मागील ३१ वर्षात सिंचनाकरिता जास्तीत जास्त ४४ हे. मागणी प्राप्त झालेली आहे.

(४) बंद पाईप लाईन व्दारे कालवा दूरूस्तीची कामे विशेष दुरूस्ती अंतर्गत नलिका वितरण प्रणाली धोरण ०२.०२.२०१७ अन्वये प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४५) ८३२३६ (२०-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

तथापी वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत प्रगतीत असून डिसेंबर २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील राजिवली धरण प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४६) ८३३५१ (१८-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील राजिवली धरण प्रकल्पाचे काम निकृष्ट झाले असून यामध्ये मोठा गैरव्यवहार झाला असल्याचे स्थानिक नागरिकांनी मिळविलेल्या माहितीच्या आधारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार राजिवली धरण प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपळगांव (वखाजी) (जि.नागपूर) प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत**

**(४७) ८३४०१ (१८-०४-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगांव लघु पाटबंधारे प्रकल्प, ता.नरखेड, जि.नागपूर ही योजना नागपूर - सावरगांव नरखेड राज्यमार्ग क्रमांक २४६ वर पिंपळगांव (वखाजी) गावाजवळ (स्थानिक) नाल्यावर माहे मार्च, २००६ सालापासून बांधकामासाठी कार्यन्वित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाची सिंचन क्षमता ९१५ हे. असून सद्यस्थितीत रेल्वे क्रॉसिंगपर्यंत ३४८ हे.सिंचन क्षमता निर्माण झालेली असून रेल्वे क्रासिंगचे व रस्ता बांधकाम पूर्ण झाल्यानंतर उर्वरीत ५६७ हे. सिंचन क्षमता निर्मीत होवून प्रकल्पाची संपूर्ण ९१५ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाचे, रेल्वे क्रासिंग व रस्ता क्रासिंगच्या बांधकामाकरीता शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
सद्य:स्थितीत सदर बांधकामे पूर्ण होवून प्रकल्पाची पूर्ण ९१५ हे. सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.
(३) सदर बांधकामे मार्च, २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जवळा (बाजार) (ता.औंढ, जि.हिंगोली) येथील इंदिरा गांधी कन्या महाविद्यालयात विद्यार्थींनीसाठी करण्यात आलेल्या सायकल खरेदीत झालेली अनियमिता**

**(४८) ८३८१४ (१९-०४-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवळा (बाजार) (ता.औंढ (ना.), जि.हिंगोली) येथील इंदिरा गांधी कन्या महाविद्यालयात विद्यार्थींनीसाठी करण्यात आलेल्या सायकल खरेदी प्रक्रिया शासन निर्णयाला धरून नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सायकल खरेदीत अनियमितता झाली असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी संबंधीत पालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अशी मागणी कोणत्याही पालकांनी केलेली नाही.

(३) सदर सायकल खरेदी प्रकरणी शासन आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे पर्यायाने अनियमितता आढळून आल्याने, मानव विकास आयुक्त, औरंगाबाद यांना यासंदर्भात शासनाच्या पत्र क्र.विसताप्र-२०१७/८३८१४/ प्र.क्र.२०/का.१४१८,दि.२१ मार्च, २०१७ अन्वये संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंध्रप्रदेशामध्ये पोलावरम प्रकल्पामधील ८० टीएमसी पाण्यापैकी १४ टी.एम.सी पाणी महाराष्ट्राला मिळण्याबाबत**

**(४९) ८३९५८ (१९-०४-२०१७). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंध्र प्रदेशमध्ये झालेल्या पोलावरम प्रकल्पासाठी ८० टीएमसी पाणी महाराष्ट्राने दिले आहे त्यात १४ टीएमसी पाणी हे महाराष्ट्रातील गोदावरी खोऱ्यातील आहे तसेच हे १४ टीएमसी पाणी कृष्णा खोऱ्यातून नागार्जुन सागर धरणाच्या वर महाराष्ट्राने उचलून गोदावरी खोऱ्याला देण्याचा करार झालेला असून करारानुसार १४ टी.एम.सी पाणी मिळविण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारानुसार १४ टी.एम.सी पाणी मिळविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वस्तू व सेवा करामुळे राज्याला होणारे आर्थिक नुकसान टाळण्याबाबत**

**(५०) ८४७४१ (२०-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने वस्तू व सेवा करासंदर्भात (जीएसटी) संसदेने मंजूर कलेल्या संविधानाच्या १२२ व्या घटनादुरुस्तीला दिनांक २६ ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्यासुमारास विशेष अधिवेशन बोलवून मंजूरी दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जीएसटी लागू झाल्यावर राज्याला आर्थिक नुकसान होणार असून महापालिकेला जकात करातून मिळणारे उत्पन्न बंद होणार आहे तसेच महागाई वाढण्याची शक्यता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीएसटीमुळे राज्याला होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०६-२०१७) :**(१) होय.
(२) महापालिकेस जकात करातून मिळणारे उत्पन्न बंद होणार आहे हे खरे आहे, मात्र जीएसटी अंतर्गत करावरील कराचा बोजा नष्ट होईल तसेच विविध अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने कर अनुपालनाचा खर्च कमी होतील व वस्तूच्या किंमती कमी होण्याची शक्यता असल्याने महागाई वाढण्याची शक्यता आहे, हे खरे नाही.
(३) जीएसटी अंतर्गत वस्तू व सेवावरील कराचे दर अद्‌याप निश्चित झालेले नाही. तसेच जीएसटीचा एकूण अर्थ व्यवस्थेवर व पर्यायाने कर महसूलावर होणारा परिणाम निश्चित करणे सद्‌य:परिस्थितीत शक्य नाही. मात्र, जीएसटी अंतर्गत आर्थिक नुकसान आल्यास संविधान संशोधन कायद्‌यानुसार जीएसटी अंमलबजावणी झाल्यानंतरच्या पाच वर्ष केंद्र शासन राज्यास आर्थिक नुकसानाची भरपाई करणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** | **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.